# महिला व बालविकास आयुक्तालय

२८,राणीचा बाग ,जुन्या सर्किट हाउस शेजारी ,पुणे ०१.

## प्रसिध्दीपत्रक

आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अधिनस्त आस्थापनेवरील गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड या संवर्गातल भूतपुर्व दुय्यम सेवा मंडळाच्या कक्षेतील निम्न नमुद सरळसेवा कोटयातील रिक्त असलेली पदे भरण्याकरीता पात्र उमेदवारांकडुन दि.१४-१०-२०२४ ते दि.१०-११-२०२४ ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आलेले होते. सदर भरती प्रक्रियेच्या संगणक आधारीत **वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची ऑनलाईन परीक्षा राज्यातील ४५ परीक्षा केंद्रावर दि.१०-२-२०२५ ते दि.१३-२-२०२५ व दि.१७-२-२०२५ रोजी** विविध सत्रामध्ये आयोजित करण्यात आलेल्या होत्या.

**१.** उक्त नमुद सदर संगणक आधारीत वस्तुनिष्ठ ऑनलाईन परीक्षेच्या उत्तरतालिका व प्रश्नतालिका पाहण्याची तसेच प्रश्नतालिका /उत्तरतालिका याबाबत आक्षेप असल्यास ते सादर करण्याबाबतची ऑनलाईन सुविधा शुक्रवार **दि.२८-२-२०२५ते दि.८-३-२०२५** पर्यंत उमेदवारांना उपलब्ध करुन देण्यात आलेली होती.

२. त्यानुसार, उमेदवारांनी सादर केलेले आक्षेप विचारात घेवून,उक्त नमुद ऑनलाईन परिक्षेची **सुधारीत उत्तरतालिका दि. २४/४/२०२५ पासून** पाहण्याची ऑनलाईन सुविधा उपलब्ध करुन देत असल्याबाबतचे महिला व बाल विकास आयुक्तालयाच्या दि.२३/०४/२०२५ रोजीच्या प्रसिध्दी पत्रकान्वये कळविण्यात आलेले होते. **तथापि, टि.सी.एस कंपनीकडील काही तांत्रिक अडचणीमुळे सुधारीत उत्तरतालिका दि.२६-४-२०२५ रोजी संबधीत उमेदवारांना उपलब्ध करुन देण्यात येणार आहे याची सर्व उमदेवारांनी कृपया नोंद घ्यावी.**

**३.** सदर सुविधेसाठी उमेदवारांनी https://www.wcdcommpune.com या संकेतस्थळावर त्यांचे विहीत आयडी व पासवर्डव्दारे लॉग इन करावे.https://www.wcdcommpune.com या संकेतस्थळावर लॉगिन करताना तांत्रिक अडचण आल्यास संबधित उमेदवारांनी **७३५३००९०९४** या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा. सदर टोल फ्री क्रमांक सोमवार ते शनिवारी सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.०० या कालावधीत सुरु राहील.

**दिनांक २५-४-२०२५**
**स्थळ :- पुणे**

**(नयना अर्जुन गुंडे) भा.प्र.से**
**आयुक्त**
**महिला बाल विकास**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**